36

(8)

श्री. विजय कोते,
नियंत्रक

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
# राहुरी, जि . अहमदनगर

दुरध्वनी क्र . ०२४२६/२४३२२६ फॅक्स क्रमांक : ०२४२६/ २४३२३८
E.mail : Comptmpkv@gmail.com

जा.क्र .मफुकृवि/नियंत्रक/अग्रिम/इंधन/ १७३ /२०१७ दिनांक : १४/०७/२०१७

## परिपत्रक

विषय :- इंधन अग्रीम कार्यपध्दतीमध्ये बदल करणे बाबत...

संदर्भ :- १) कुलसचिव यांचे पत्र.क्र.कृ.अ.म./इंधन/पे.पंप/४०५/२०१७, दि.०४.०३.२०१७.

२) जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/अग्रिम/इंधन/१५८/२०१७, दि. ०३.०७.२०१७

मध्यवर्ती परिसरामधील विद्यापीठ मालकीच्या, हलक्या प्रवासी वाहनांशिवाय (LMVs) इतर वाहने/ यंत्रसामुग्री / जनरेटर / ट्रॅक्टर / मोटारसायकल आदि वाहनांच्या विद्यापीठ कामकाजासाठी वापर करण्यात येतो. त्यासाठी लागणारे इंधन हे अग्रीमधन घेऊन खरेदी करण्यात येते. परंतू शासनाच्या कॅशलेस प्रणालीच्या धोरणानुसार इंधन अग्रीमधन प्रणालीमध्ये दि. ०१.०७.२०१७ पासुन संदर्भ क्र. २ अन्वये बदल करण्यात आलेला आहे.

या अनुषंगाने असे आदेशित करण्यात येते की, वरील यंत्रसामुग्री / जनरेटर / ट्रॅक्टर / मोटारसायकल आदि वाहनांसाठी अग्रीमधन न देता विद्यापीठाच्या पंपावरून आवश्यक इंधन खरेदी क्रेडीट बिलावरून करण्यात यावी. इंधन खरेदी करण्यासाठी विद्यापीठ पेट्रोल पंपाचाच वापर करण्यात यावा. इतर पेट्रोल पंपाची बिले ग्राह्य धरली जाणार नाहीत. विद्यापीठ पेट्रोल पंपावरून इंधन खरेदी करताना संबंधीत कार्यालय प्रमुख यांनी सोबतच्या नमुण्यात मागणी द्यावी.

तसेच आहरण व संवितरण अधिकारी मफुकृवि, राहुरी यांनी पेट्रोल पंपावरून क्रेडीट बील घेऊन साधारणतः मासीक देयक तयार करून अधिदान व लेखा अधिकारी / अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी यांचेकडे अदायगीसाठी पाठवावे. अधिदान व लेखा अधिकारी / अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी यांनी प्रदानाची रक्कम पेट्रोल पंपाच्या ॲक्सीस बँक राहूरी खाते क्रमांक ९१२०२००१६३५५६२६ यावर थेट जमा करावी.

अधिदान व लेखा अधिकारी / अतिरीक्त अधिदान व लेखा अधिकारी व प्रभारी अधिकारी पेट्रोल पंप यांनी इंधन खरेदीच्या व्यवहारांचा मासिक ताळमेळ संदर्भ क्र. २ मधील तरतूदीनूसार नियमितपणे घ्यावा.

वरील व्यवस्था अमलात असल्यामुळे इंधनाकरीता रोख अग्रीम देण्यात येणार नाही. सदर व्यवस्था दि १४.०७.२०१७ पासुन अंमलात येईल.

नियंत्रक,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी.

# मागणीपत्र

दिनांक :

प्रति,

प्रभारी व्यवस्थापक,
पेट्रोल पंप,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी.

विषय :- इंधन मिळणेबाबत...

संदर्भ :- १) कुलसचिव यांचे पत्र.क्र.कृ.अ.म./इंधन/पे.पंप/४०५/२०१७, दि.०४.०३.२०१७.
२) जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/अग्रिम/इंधन/१५८/२०१७, दि. ०३.०७.२०१७
३) जा.क्र.मफुकृवि/नियंत्रक/अग्रिम/इंधन/१७३/२०१७, दि. १४.०७.२०१७

कृपया खालील तपशिलाप्रमाणे इंधन मिळावे.

| अ. नं. | विभागाचे नाव | इंधन प्रकार | परिमाण (लिटर) | किंमत (रू) | ताब्यात घेणाऱ्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | | पेट्रोल | | | |
| २ | | डिझेल | | | |
| ३ | | ऑईल | | | |

वरील प्रमाणे इंधन मिळाले.

(ताब्यात घेणाऱ्याची स्वाक्षरी व दिनांक)

कार्यालय प्रमुख सही व शिक्का